अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि.१ फेब्रुवारी २०२४ | ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : १२३ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## एम.राजकुमार सोलापूरचे नवे पोलीस आयुक्त

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्याच्या गृहविभागाच्या वतीने ४४ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश बुधवारी काढले. यामध्ये सोलापूरचेपोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांची बदली महाराष्ट्र पोलिस अकादमी, नाशिक येथे सहसंचालक म्हणून झाली.

सोलापूरच्या पोलिस आयुक्तपदी जळगावचे पोलिस अधीक्षक एम. राजकुमार यांची पद्दोन्नतीने वर्णी लागली आहे. या बदल्यांमध्ये रितेश कुमार, अमितेश कुमार, प्रभात कुमार, रवींद्रकुमार सिंगल, शिरीष जैन, दीपक पांडे, दत्तात्रय कराळे, संजय शिंदे, प्रवीण पवार, प्रवीणकुमार पडवळ, संजय दराडे, ज्ञानेश्वर चव्हाण, एस. डी. एनपुरे, एन.डी. रेड्डी, संदीप पाटील, विरेंद्र मिश्रा, रंजन कुमार शर्मा, नामदेव चव्हाण, राजेंद्र माने, विनिता साहु, एम. राजकुमार, अंकित गोयल, बसवराज तेली,



शैलेश बलकवडे, शहाजी उमाप, एस.जी. दिवाण, संजय शिंत्रे, मनोज पाटील,, विक्रम देशमाने, पंकज देशमुख, एमसीव्ही महेश्वर रेड्डी, अजय कुमार बन्सल, रविंद्रसिंह परदेशी, रागसुधा आर., संदीप घुगे, मुमक्का सुदर्शन, धोंडोपंत स्वामी, पंकज कुमावत, मितेष घट्टे, विक्रम साळी, आनंद भोईटे, संदीप पखाले, रमेश धुमाळ, संदीप घुगे व समाधान पवार यांचा समावेश आहे.

# दादांना दगाफटक्याची धास्ती, ‘देवगिरी’वर साऱ्यांना दिली तंबी

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा गट) हायकमांड तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना दगाफटका होण्याची धास्ती लागून आहे. दादा हे जसे कुशल प्रशासक आणि आक्रमक आहेत, ते सावधही असतात.राज्यात काय चालले आहे याची खडानखडा माहिती त्यांच्याकडे असते. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस आमदारांच्या अपात्रतेबाबत महत्त्वाची सुनावणी सुरू आहे. त्यातच राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी आपल्या समर्थक आमदारांची बैठक घेतली. कुठल्याही फॉर्मवर सह्या करू नका, मीडियाशी काहीही बोलू नका, अशी तंबी दादांनी आमदार, मंत्र्यांना दिल्या आहेत. त्यामुळे अजित पवार गट अलर्ट मोडवर असल्याचे बोलले जाते.**

राज्यसभा निवडणुकीचे बिगूल वाजले असून याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानंतर अजित पवार गटाच्या आमदारांची उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर बैठक पार पडली. त्यात अजित पवारांनी आमदार, मंत्र्यांना कुणी कुठल्याही फॉर्मवर आणि पत्रावर सह्या करू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सूचक, अनुमोदक होऊ नये असे सांगण्यात आले आहे. मागील राज्यसभा निवडणुकीत राज्यात कशाप्रकारे काटे की टक्कर झाल्याचे पाहायला मिळाले होते. त्यामुळे या निवडणुकीत प्रत्येक मत महत्त्वाचे आहे. त्यामुळे ही त्यांनी काळजी घेतल्याचे सांगण्यात येते. राज्यसभेच्या ६ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यात महायुतीकडून अजित पवार गटाला १ जागा देण्यात येईल असे चित्र आहे. इतर ५ जागांवर भाजपासह शिवसेना लढवणार आहे. त्यामुळे १ जागा कोण लढवणार आणि या निवडणुकीत काय खबरदारी घ्यायची याबाबतची सूचना देवगिरी बंगल्यावरील बैठकीत देण्यात आल्याचे सांगण्यात येते. निवडणुकीत दगाफटका होऊ नये यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे,असे सांगितले जाते. अजित पवार गटाकडून उमेदवार कोण असेल त्याबाबत येणाऱ्या काळात निर्णय घेतला जाईल असे सूत्रांकडून सांगण्यात आले.

### ‘जोर का झटका’

**दादांना शरद पवार गटाबरोबरच महायुतीच्या सत्तेतूनही भीती लागून आहे.त्याची प्रचिती बुधवारी आली. राज्यातील अतिवरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या पातळीवर बुधवारी मोठा खांदेपालट झाला. त्यात पुण्याचे पोलीस आयुक्त (सीपी) रितेशकुमार यांची झालेली बदली म्हणजे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दुसरे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला जोरदार धक्का समजला जात आहे.एक कुमार जाऊन दुसरे अमितेश कुमार पुणे सीपी म्हणून आले आहेत. अजितदादा पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यात नागपूरहून पोलीस अधिकारी आणले जात आहेत. या उद्योगनगरीत बदल्या करण्यात आलेल्या २३ पैकी बहुतांश पीआय हे नागपूरहून आले आहेत.**





**'लाव रे तो व्हिडिओ' :** राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकारणाची सुनावणी सुरू आहे. दोन्ही गटाच्या नेत्यांची साक्ष पूर्ण झाल्या आहेत. शरद पवार गटाचे वकील शरण जेठीयाणी यांनी अजित पवार गटाच्या नेत्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. हे सगळे करताना त्यांनी सोशल मीडियाचा पुरेपूर उपयोग करत 'लाव रे तो व्हिडिओ'चा वापर केला. सर्वात आधी शरद पवार गटाकडून जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड आणि हेमंत टकले यांची उलट तपासणी पार पडली. त्यानंतर अजित पवार गटाकडून सुनील तटकरे आणि अनिल पाटील यांची उलटतपासणी पार पडली. ज्यावेळी अजित पवार गटाच्या नेत्यांची उलटतपासणी सुरू होती, त्यावेळी शरद पवार गटाकडून सोशल मीडियाचा पुरेपूर वापर केला गेला. शरद पवार गटाकडून सुनील तटकरे आणि अनिल पाटील यांचे व्हिडिओ दाखवण्यात आले शरद पवार यांना अध्यक्षपदाचा राजीनामा न देण्याची मागणी ते व्हिडिओत करताना दिसत आहेत.

**कोंडीत पकडले :** शरद पवार यांनी ज्यावेळी अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळी राष्ट्रवादीतील सर्वच नेत्यांनी त्यांना राजीनाम्याचा निर्णय मागे घेण्याची गळ घातली होती. यामध्ये सुनील तटकरे आणि अनिल पाटील यांचे व्हिडिओ दाखवण्यात आले. साहेबांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊ नये, असे ते माध्यमांशी संवाद साधताना बोलले होते. हेच लोक आहेत जे आता त्यांचे पद मान्य करत नाहीत, हे दाखवण्याचा प्रयत्न शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा उपयोग करत अजित पवार गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न शरद पवार गटाकडून केला गेला.

**शरद पवार गटाला शह :** राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणी अजित पवार गटाच्या वकिलांनी सुनावणीमध्ये महत्त्वाचा युक्तिवाद केला. राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड घटनेनुसार झालेली नसून, शरद पवारांसह पटेल, तटकरे यांची नेमणूक निवडणूक न घेता झाल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाचे वकील विरेंद्र तुळजापूरकर यांनी केला. घटनेनुसार शरद पवार हे पक्षाचे सदस्य नाहीत मग अध्यक्ष कसे होऊ शकतात? असा सवालही अजित पवार गटाच्या वकिलांनी केला. तसेच विधीमंडळात किती बहुमताला सर्वाधिक महत्व असल्याचाही युक्तिवाद त्यांनी केला.

## लाकडी वाशाने मारून वृद्ध इसमाचा खून; आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

माहेरी राहण्यास आलेल्या विवाहित मुलीचे भांडण सोडविण्यास गेलेल्या ६५ वर्षीय इसमाच्या डोक्यात लाकडी वाशाने प्रहार करून खून केल्याच्या आरोपावरून सद्दाम उर्फ फरदीन गफूर शेख (वय २९ रा.राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर) याला जन्मठेप आणि ८ हजार रुपये दंड अशी शिक्षा जिल्हा सत्रन्यायाधीश एस.आर. शिंदे यांनी बुधवारी ठोठावली. ही घटना राहुल गांधी झोपडपट्टी येथे २० सप्टेंबर २०२० रोजी रात्रीच्या सुमारास घडली होती.

अय्युब हुसेनसाहेब उस्ताद (वय ६५ रा. राहुलगांधी झोपडपट्टी) असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे. यावेळी झालेल्या मारहाणीत त्यांची विवाहित मुलगी गुलनाज वाहिद तांबोळी (वय २८ रा.उस्मानाबाद सध्या रा.राहुल गांधी झोपडपट्टी ) या देखील गंभीर जखमी झाल्या होत्या.या प्रकरणी जेल



रोडच्या पोलिसांनी आरोपी सद्दाम शेख यांच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून अटक केली होती.उस्मानाबाद येथे राहणाऱ्या गुलनाज तांबोळी या आईची तब्येत बरी नसल्याने घटनेच्या ८ दिवसापूर्वी सोलापूरात माहेरी आल्या होत्या. त्यांच्या घराशेजारी राहणारा आरोपी सद्दाम हा, तू माझ्या पत्नीला माझ्याविषयी चुकीचे का बोलते ? असे म्हणून नेहमी भांडण करीत होता.घटनेच्या दिवशी म्हणजेच २८ सप्टेंबर २०२० रोजी सायंकाळच्या सुमारास आरोपी सद्दाम हा त्यांचा घराजवळ येऊन भांडण करीत होता. त्यावेळी गुलनाज तांबोळी या समजावून सांगत असताना आरोपी सद्दाम हा घरात जाऊन लाकडी वासा आणून त्यांना मारहाण करू लागला. त्यावेळी त्यांचे वडील अय्युब उस्ताद हे भांडण सोडण्यासाठी आले असता आरोपीने त्यांनाही मारहाण केली होती. दोघांना गंभीर अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान उस्ताद हे मरण पावले. न्यायालयाने आरोपीला खुनाच्या आरोपावरून जन्मठेप आणि ३ हजार रुपये दंड, खुनाचा प्रयत्नाच्या आरोपावरून ७ वर्षे सक्त मजुरी आणि ३ हजार रुपये दंड तर पुरावा नष्ट केल्या प्रकरणी १ वर्षे सक्त मजुरी आणि २ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

खटल्यात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत तर आरोपीतर्फे ड. एम.बी. सोलणकर यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून महिला पोलीस शिपाई जहागीरदार यांनी सहकार्य केले.

## रानमसले येथे दिवसा घरफोडी; ८ लाखांची रोकड गायब

✔ सुराज्य/सोलापूर

बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील ८ लाख १० हजार रुपयाची रोकड पळवली. ही धाडसी चोरी रानमसले (ता. उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी घडली.



यासंदर्भात मधुकर बाळासाहेब गरड (रा. रानमसले) यांनी तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. ते काल सकाळी नेहमीप्रमाणे मुलासोबत साखर कारखाना येथे कामाला गेले होते. दुपारच्या सुमारास त्यांची पत्नी घराला कुलूप लावून शेतात गेल्या होत्या. परत आल्यानंतर त्यांना दरवाजाला लावलेले कुलूप तोडल्याचे तसेच आतून कोंडी लावल्याचे दिसून आले. त्यांनी फोन करून मधुकर गरड यांना बोलावून घेतले. तेव्हा त्यांनी शौचालयाच्या पाईप वरून धाब्यावर प्रवेश केला. त्यानंतर त्यांना बेडरूममधील कपाट उचकटून चोरट्याने रोकड पळवल्याचे आढळले.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक आवटे करीत आहेत.

## विविध ठिकाणी दुचाकी घसरून झालेल्या अपघातामधील तिघा जखमींचा मृत्यू

✔ **सोलापूर** : अक्कलकोट, सांगोला आणि टेंभुर्णी परिसरात विविध ठिकाणी दुचाकी घसरून झालेल्या अपघातामधील तिघा जखमींचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मृत्यू झाल्याची नोंद ग्रामीण पोलिसात आज बुधवारी झाली आहे.

त्यापैकी पहिला अपघात टेंभुर्णी (ता. माढा) येथील एमआयडीसी चौकाजवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला होता. त्यात पवन राजाराम कोळ (वय २५ रा. टेंभुर्णी हा दुचाकीवरून घसरून गंभीर जखमी झाला होता. त्याला टेंभुर्णी येथे प्राथमिक उपचार करून अनिल (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.उपचारादरम्यान तो आज पहाटे मयत झाला. दुसरा अपघात त्याच दिवशी रात्रीच्या सुमारास जवळगी (ता. अक्कलकोट) येथील बगले वस्ती जवळ झाला होता. विलास भैरवनाथ माळी वय (२९ रा.तडवळ ता.अक्कलकोट) हा दुचाकी वरून घसरून गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो आज सकाळी मयत झाला. तर तिसरी अपघाताची घटना एकतपूर (ता.सांगोला) येथील मारुती मंदिराजवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली होती.शहाजी शिवाजी वाघमारे (वय ४० रा.एकतपुर) असे मयताचे नाव आहे .ते सोमवारी पळशी सुपली येथून दुचाकी वरून आपल्या घराकडे निघाले होते. या तिन्ही अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .




## सोन्याच्या हंड्याचे आमिष दाखवून लाखांना गंडा

✔ सुराज्य/सोलापूर

खड्ड्यात गाडलेला हंडा सापडला असून अंदाजे अर्धा किलो सोने आहे,तुम्ही कोणाला न सांगता घेणार आहात का असे म्हणून व्यवसायिक स्क्रॅप दुकानदार यांना दोन लाखांना फसवल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना २५ ते ३० जानेवारी दरम्यान जय संतोषी माँ स्क्रॅप दुकान गोविंद श्री मंगल कार्यालय येथे घडली.

याप्रकरणी सुभाष विठ्ठल नन्नवरे (वय-५४,बुरुडकर टॉवर,माशाळ वस्ती,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून एक अनोळखी युवक व त्याचा चुलता जैताराम (रा.राजस्थान) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई. गायकवाड हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

✔ **सोलापूर** : एका ८ वर्षाच्या मुलीच्या अंगास हात लावून विनयभंग केला तसेच ही घटना कोणालाही सांगू नकोस असे म्हणून डोळे वठारून भिती दाखवून मुलीच्या नाजूक जागेस स्पर्श केल्यप्रकरणी एका जणाच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात विनयभंग व ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

घटनेचा जाब विचारण्याकरिता त्या मुलीची आई व मावशी गेली असता उलट संशयित आरोपी याने अंगावर येऊन मारहाण करण्याचा प्रयत्न केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जानेवारी खूप टफ गेला!

कल्याण
139-30-668

मुंबई
357-55-159

## ज्ञानवापी मशिदीतील व्यास तळघरात पूजा करण्यास परवानगी

### हिंदू पक्षकारांना दिलासा

✔ सुराज्य/लखनऊ

**ज्ञानवापी मशीद प्रकरणात मोठ निर्णय समोर आला आहे. ज्ञानवापी मशिदीतील व्यास तळघरात हिंदू पक्षकारांना पूजा करण्याचा अधिकार मिळाला आहे. ज्ञानवापी मशिदीतील व्यास तळघरात आता हिंदू भाविक पूजा करु शकतात. वाराणसीमधील न्यायालयानं याबाबत निर्णय दिला आहे. हिंदू पक्षकारांनी व्यास तळघरात १९९१ पर्यंत पूजा होत असल्याचा दावा होता. न्यायालयानं काल व्यास तळघर जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवलं होतं. ७ दिवसात पूज करण्याची व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुस्लीम पक्षकारांकडून या निर्णयाला उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं जाऊ शकतं.**

वाराणसी जिल्हा न्यायालयानं व्यास तळघर जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलं होतं. आता व्यास तळघरात पूजा करण्याची व्यवस्था येत्या ७ दिवसात करण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत.

ज्ञानवापी मशिदीतील व्यास तळघरात सोमनाथ व्यास यांच्या कुटुंबीयांकडून १९९३ पर्यंत पूजा करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणात आता वाराणसी कोर्टानं हिंदू पक्षकारांना पूजा करण्यास परवानगी दिली आहे.

१९९३ पासून ज्ञानवापी मशिदीतील व्यास तळघरातील पूजा बंद करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा तळघरातील पूजा सुरु करण्यास



जिल्हा न्यायालयानं परवानगी दिली आहे.अयोध्येतील मशीद उभारणीत अडथळ्यांची शर्यत, अद्याप नकाशाला मंजुरी नाही, नाव अन् रचनेवरुनही मतभेद

हिंदू पक्षकारांच्या वकिलांनी ज्ञानवापी प्रकरणात हा पहिला विजय असल्याचं म्हटलं आहे. वकिल विष्णू जैन यांनी आम्ही यापुढे देखील लढा सुरु ठेवणार असल्याचं म्हटलं. १९८६ च्या निकालाप्रमाण हा निकाल असल्याचं विष्णू जैन म्हटले आहेत.

दरम्यान, मुस्लीम पक्षकारांकडून या निर्णयाला उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं जाण्याची शक्यता आहे. ज्ञानवापी मशिदीचं गेल्या वर्षी भारतीय पुरातत्व विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आलं होतं. आजच्या निर्णयामुळं ज्ञानवापी मशिदीत पूजा करण्यासाठी जाण्यासाठी हिंदू पक्षकारांना परवानगी मिळाली आहे. ज्ञानवापी मशिदीत दोन तळघरं असून त्यातील दुसऱ्या तळघराचा ताबा मुस्लीम पक्षकारांकडे आहे. आजचा निर्णय हिंदू पक्षकारांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. ज्ञानवापी मशीद प्रकरणात सुप्रीम कोर्टात देखील सुनावणी सुरु आहे.

## भाजलेल्या विवाहित तरुणीचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

शेतात कचरा पेटवताना अंगावरील कपडे पेटून भाजून गंभीर जखमी झालेली रंजना काशिनाथ साळुंखे (वय २२ रा.भालकी, सध्या रा.बेंबळी जि. लातूर) ही सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मयत झाली.

शुक्रवार दि. २६ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास ती बेंबळी (ता.देवणी) येथील मारुती पाटील यांच्या शेतात कचरा पेटवत होती. त्यावेळी ती आगीच्या भडक्याने अंगावरील कपडे पेटून ती गंभीर भाजली होती. तिला उदगीर, बिदर आणि सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार करून दुसऱ्या दिवशी रेणुका चव्हाण (आई) यांनी बेशुद्ध अवस्थेत सोलापूरात दाखल केली होती. उपचारादरम्यान ती आज सकाळी मयत झाली. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.